**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत सर्व प्राथमिक शिक्षकांनी प्रशिक्षित होण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: पीआरई -२०१०/प्र.क्र.२१३/प्राशि १
दिनांक १४ जून, २०१०

पहा:- १) शासन पूरक पत्र शालेय शिक्षण विभाग क्र.संघट-१०९९/२०८९/ प्राशि-१ दि.१ जून २०००.
२) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. सीपीटी-१०००(१३२/२०००) प्राशि-३, दि.२ जून २०००.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.विपसू-२००७/(५८५/०७) /प्राशि-१, दि.२९-१-२००८

**<u>शासन परिपत्रक</u>**:- केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान -विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (No.35, 2009), केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या २७.८.२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६.२.२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक १.४.२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमुद केले आहे.

२. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात, यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्विकारली आहे.

३. सदर अधिनियमाच्या कलम २३(१) अनुसार प्राथमिक शाळेतील शिक्षक हे प्रशिक्षित असणे अनिवार्य केले आहे. तसेच, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २३ (२) अनुसार एखाद्या राज्यात अध्यापक प्रशिक्षण देण्या-या पुरेशा संस्था नसल्यास अथवा पोटकलम (१) अन्वये निर्धारित केलेली किमान व्यावसायीक अर्हता धारण करणारे पुरेसे शिक्षक उपलब्ध नसतील तेथे त्याबाबत केंद्र सरकारला त्यास योग्य वाटल्यास अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा व पाच वर्षाहून अधिक नसलेल्या कालावधीकरिता शिक्षकाची नेमणूक करण्यास आवश्यक असलेली किमान अर्हता शिथील करण्याची तरतूद आहे. परंतु जे शिक्षक या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पोटकलम (१) अन्वये नमूद केलेली किमान अर्हता धारण करीत नसल्यास, पाच वर्षाच्या कालावधीत अशी किमान अर्हता प्राप्त करतील, असे नमूद केले आहे. त्यानुसार इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या शाळेत वैयक्तिक मान्यताप्राप्त अप्रशिक्षीत शिक्षकांनी पाच वर्षाच्या कालावधीत प्रशिक्षित होणे अनिवार्य आहे.

४. राज्यातील प्राथमिक शिक्षकांची शैक्षणिक अर्हता डी.एड् अशी असणे आवश्यक आहे. तसेच, इयत्ता आठवीच्या वर्गासाठी पदवी + बी.एड. अशी शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे. प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवी ते आठवीच्या वर्गांना एकूण शिक्षकाच्या २५ टक्के पदे ही पदवीधारक बी.एड. मधून भरण्यात येतात. त्यामुळे अशा **पदवीधारक शिक्षकाच्या पदावरील अप्रशिक्षित (पदवीधर परंतु बी.एड नसलेल्या) शिक्षकांनीही स्वखर्चाने दि.३१ मार्च २०१५ पर्यंत बी.एड.अर्हता** धारण करणे आवश्यक आहे. राज्यात १३७६ अध्यापक विद्यालये असून शिक्षकांची आवश्यकता लक्षात घेता अशा विद्यालयांची संख्या पुरेशी आहे.

५. सध्या प्राथमिक शाळेमध्ये बारावी डी.एड् शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांची शिक्षण सेवक या पदावर नियुक्ती केल्यावर तीन वर्षाच्या कालावधीनंतर त्यांना नियमित वेतनश्रेणीत शिक्षक पदावर सामावून घेण्यात येते. या शिक्षण सेवकांमध्ये अनुसूचित जमाती/भटक्या व विमुक्त जाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारास इयत्ता बारावी उत्तीर्ण असल्यास अप्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती देण्यात येते. राज्यामध्ये असे अनेक शिक्षण सेवक अप्रशिक्षित असल्यामुळे त्यांना उपरोक्त कलम २३(२) नुसार प्रशिक्षित होण्यासाठी ५ वर्षाचा कालावधी देणे आवश्यक आहे. सदर अधिनियम दि.१.४.२०१० पासून अंमलात आला असल्यामुळे सध्या शिक्षण सेवक/शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या सर्व **अप्रशिक्षित शिक्षण सेवक / शिक्षकांना दि.३१ मार्च २०१५ पर्यंत प्रशिक्षित शिक्षकाची अर्हता धारण करण्यासाठी पुरेशा संधी देण्यात याव्यात.** या कालावधीत अशा अप्रशिक्षित शिक्षकांनी विहित अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

६. सध्या पत्राद्वारे डी.एड् पात्रता धारण करण्यासाठी संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत अभ्यासक्रम आयोजित करण्यात येतो. तथापि, आतापर्यंत काही अप्रशिक्षित शिक्षक/शिक्षण सेवकांनी असे प्रशिक्षण पूर्ण केलेले नाही. तथापि, बालकांचा सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा लागू झाला असल्यामुळे सर्व **अप्रशिक्षित शिक्षकांनी कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त ५ वर्षाच्या कालावधीत स्वखर्चाने प्रशिक्षण पूर्ण करुन विहित अर्हता धारण करणे आवश्यक आहे.** यासाठी संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी व **वैयक्तिक मान्यताप्राप्त अप्रशिक्षित कोणत्याही शिक्षकांना त्यांनी प्रशिक्षणासाठी अर्ज केला असेल तर त्यांना त्याच वर्षी पत्राद्वारे प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी.**

७ यासंदर्भात शासन निर्णय दि.२९ जानेवारी २००८ अन्वये अप्रशिक्षित शिक्षण सेवकास अमर्यादित कालावधीपर्यंत प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली होती. ती संधी आता उपरोक्त दि.३१ मार्च २०१५ पर्यंत मर्यादित राहील.

८. तसेच माध्यमिक शाळेला जोडून असलेल्या प्राथमिक शाळेत शारिरिक शिक्षक म्हणून पदवीधर **अप्रशिक्षित शारिरिक शिक्षकास सुद्धा अधिनियमातील तरतुदीनुसार दि.३१ मार्च २०१५ पर्यंत स्वखर्चाने प्रशिक्षित शिक्षकाची अर्हता धारण करणे आवश्यक आहे.**

९. सदर शासन निर्णयानुसार अप्रशिक्षित शिक्षकांना कालमर्यादेत प्रशिक्षित होणे आवश्यक असल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी यांनी वरील बाब सर्व अप्रशिक्षित शिक्षकांना पत्राद्वारे निदर्शनास आणावी व त्याची पोच घ्यावी.

१०. सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर देण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१००615185707001 आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ना.ऊ.रौसळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
मा. मुख्यसचिव, यांचे स्वीय सहाय्यक ,
मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व आयुक्त, महानगरपालिका
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व आयुक्त, महानगरपालिका
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण ),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती),पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ) जिल्हा परिषद
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद / कटकमंडळे
शिक्षण निरिक्षक (दक्षिण /पश्चिम / उत्तर) बृहन्मुंबई
निवड नस्ती (प्राशि-१)